# आवडीचे क्षेत्र निवडून करिअर करा!

## हळबे महाविद्यालयाच्या पारितोषिक वितरण समारंभप्रसंगी सचिन परब यांचे प्रतिपादन

▶ दोडामार्ग (प्रतिनिधी)

पैसा मिळणाऱ्या क्षेत्रापेक्षा विद्यार्थ्यांनी आवडीचे क्षेत्र निवडावे व ते विकसीत करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यात करिअर करण्याचा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून वाटचाल करावी. यश हमखास मिळेल असे प्रतिपादन गोवा दूतचे संपादक सचिन परब यांनी केले.

दोडामार्ग येथील हळबे महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी त्यांच्यासमवेत तालुका उत्कर्ष समिती अध्यक्ष विवेकानंद नाईक, समिती सदस्य बाबुराव धुरी, जेष्ठ स्वातंत्र्यसैनिक भाई परमेकर, प्राचार्य व्ही. ए. पाटील, उदय पास्ते आदी उपस्थित होते.



बक्षीस वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना ज्येष्ठ पत्रकार सचिन परब (फोटो : तेजस देसाई)

यावेळी बोलताना सचिन परब म्हणाले, कुठल्याही स्पर्धेमध्ये भाग घेणे महत्त्वाचे आहे. जे स्पर्धेत भाग घेत नाहीत ते हरण्याला घाबरतात. हरण्याला जो घाबरतो तो आयुष्यात जिंकू शकत नाही. स्पर्धेत कोण हरतो, कोण जिंकतो, यापेक्षा सहभाग महत्वाचा आहे. कारण सहभागातून मिळणारा अनुभव अतिशय महत्वाचा असतो आणि कधी दुसऱ्याला हरवण्यासाठी न खेळता आपण यशस्वी होण्यासाठी खेळणे महत्वाचे असते. ते पुढे म्हणाले, आज आधुनिक युगात तुम्ही कोणत्या जातीचे, धर्माचे, पंथाचे हे विचारले जात नाही. तुमची काय योग्यता, तुमच्याकडे काय क्षमता आहेत हे पाहिले जाते त्यामुळे स्वतः आवड असणाऱ्या क्षेत्रात झोकून काम केले पाहिजे. त्यात विकसित केले पाहिजे. जगातील विविध दालने तुमची वाट पाहत असतील.

यावेळी तालुका उत्कर्ष समिती अध्यक्ष विवेकानंद नाईक यांनी फुड फेस्टीवल, शेअर मार्केट आदी उपक्रमांचे कौतुक केले व आपल्या विचारात कोणताही संशय न ठेवता काम करा व पुढे चला, असे सांगत नोकरी करण्यापेक्षा नोकरी निर्माण करणारे व्हा असे सांगितले.